शिक्षण प्रसारक संस्थेचे,

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जिल्हा: सांगली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६

# इतिहास विभाग

# चांगल्या उद्देशावर आधारित उपक्रम

# (Best Practices as per NAAC Guidelines)

# परिचयमाला

## सहस्त्रकातील निवडक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांची परिचयमाला

आपल्या कार्यकर्तृत्वाने जागतिक इतिहासाच्या पटलावर

आपला अविस्मरणीय ठसा उमटवणाऱ्या

जगातील १०० महान व्यक्तिमत्त्वांचा परिचय

आणि

## शिवकालीन महाराष्ट्रातील निवडक १०० गडकोटांची परिचयमाला

(दि. १ ऑगस्ट २०२५ पासून प्रतिदिन १ याप्रमाणे)

सहभागी विद्यार्थी B.A. I/II/III (इतिहास)

Shikshan Prasarak Sanstha's
**Padmabhushan Vasantraodada Patil Mahavidyalaya, Kavathe-Mahankal**
*Affiliated to Shivaji University, Kolhapur*
Academic Year 2025-26

## DEPARTMENT OF HISTORY
# BEST PRACTICES
**ONE PAGE REPORT**

| Sr. No. | Particulars | Details |
|---|---|---|
| 1 | Name of the Department | Department of History |
| 2 | Title of the Activity | **Best Practices-**<br>**1) A series of introductions to 100 selected forts from Maharashtra during the Chhatrapati Shivaji Era**<br>**2) A series of introductions to selected accomplished personalities of millennium** |
| 3 | No. of Participants | 105 |
| 3 | Background | Maharashtra's rich heritage, especially from the era of Chhatrapati Shivaji Maharaj, is reflected in its numerous forts, which symbolize historical, cultural, and strategic significance. However, students today often lack awareness and connection with this legacy. Similarly, knowledge about accomplished personalities of the millennium is essential for value-based learning but is not effectively conveyed through traditional methods.<br>Therefore, this Best Practice aims to introduce students to 100 selected forts and notable personalities in a structured and engaging way, promoting historical awareness, cultural pride, and inspiration for personal and social development. |
| 4 | Objectives | 1. To create awareness about forts from the era of Chh. Shivaji Maharaj.<br>2. To develop understanding of Maharashtra's heritage.<br>3.To introduce students to accomplished personalities of the millennium.<br>4. To inspire leadership, values, and social responsibility.<br>5. To promote interest in history and cultural learning. |
| 5 | Conclusion | This activity has proven to be an effective initiative in connecting students with their rich historical and cultural heritage. It has enhanced awareness about the significance of forts and inspired students through the lives and contributions of great personalities.<br>By combining historical understanding with value-based learning, the practice has fostered a sense of pride, responsibility, and motivation among students. It also encourages them to appreciate the legacy of the past while applying its values in contemporary society. Overall, this initiative contributes to holistic education by promoting knowledge, inspiration, and cultural consciousness. |

For Head
Head
Department of History
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya, Kavathe Mahankal

Principal
For PRINCIPAL,
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya, K.Mahankal, Dist-Sangli

P.V.P. MAHAVIDYALAYA
DIST. SANGLI 416 405.
KAVATHE-MAHANKAL

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal.Dist.Sangli

शिक्षण प्रसारक संस्थेचे,

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जिल्हा: सांगली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६

# इतिहास विभाग

## चांगल्या उद्देशावर आधारित उपक्रम
## (Best Practices as per NAAC Guidelines)

## सहस्त्रकातील निवडक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांची

# परिचयमाला

### इतिहास विभागाचा उपक्रम

आपल्या कार्यकर्तृत्वाने जागतिक इतिहासाच्या पटलावर
आपला अविस्मरणीय ठसा उमटवणाऱ्या

## जगातील १०० महान व्यक्तिमत्त्वांचा परिचय

(दि. १ ऑगस्ट २०२५ पासून प्रतिदिन १ याप्रमाणे)

सहभागी विद्यार्थी B.A. I/II/III (इतिहास)

शिक्षण प्रसारक संस्थेचे,

**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठे महांकाळ, जिल्हा: सांगली.**

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६**

# इतिहास विभाग

## चांगल्या उद्देशावर आधारित उपक्रम

## (Best Practices as per NAAC Guidelines)

# शिवकालीन महाराष्ट्रातील निवडक १०० गडकोटांची

# परिचयमाला

**इतिहास विभागाचा उपक्रम**

**(दि. १ ऑगस्ट २०२५ पासून प्रतिदिन १ याप्रमाणे)**


**सहभागी विद्यार्थी B.A. I/II/III (इतिहास)**

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal,Dist.Sangli

1 AUG 2025

## महाराष्ट्र-गुजरात सीमेवर लक्ष ठेवणारा : किल्ले हातगड

किल्ले हातगड, गडकोटांनी समृद्ध असणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील सुरगणा तालुक्याचे प्रतिनिधित्व करणारा एकमेव किल्ला. सह्याद्रीच्या उत्तरेकडील टोकाच्या पूर्व-पश्चिम रांगांमध्ये समुद्रसपाटीपासून ११४ मीटर उंचीवर मोठ्या मोक्याच्या ठिकाणी हातगड ठाण मांडून बसला आहे. गुजरात आणि महाराष्ट्राच्या अगदी सीमेवर हातगड उभा असल्यामुळे त्या काळात या किल्ल्यास फार महत्त्व होते. अनेक सत्तांतरे अनुभवणाऱ्या या किल्ल्याचा उपयोग इतिहासकाळात व्यापारी मार्गावर करडी नजर ठेवण्यासाठी होत असे. त्यामुळे या भागातील प्रत्येक राज्यकर्ता हातगडचा ताबा आपल्याकडे ठेवण्यासाठी जातीने लक्ष देई. पण सद्यस्थितीत मात्र आपल्या अंगावर अनेक दुर्गअवशेष अभिमानने जपणारा हा किल्ला दुर्गप्रेमींच्या कडूनच काय तर पायथ्याच्या ग्रामस्थांकडून सुद्धा दुर्लक्षिला गेला आहे.हातगडला भेट




देण्यासाठी आपण नाशिकहून वणीमार्गे बोरगाव गाठायचे. (वणी-बोरगाव अंतर २७कि.मी.) बोरगावहून गडपायथ्याचे हातगड हे गाव फक्त ४ कि.मी. अंतरावर असून मिळेल त्या खाजगी वाहनाने आपण गडपायथ्याचे हातगड गाव गाठायचे. वणी-सापुतारा (गुजरात) मार्गाला खेटूनच हातगड गाव वसल्यामुळे गावाच्या फाट्यावर नेहमी लोकांचा राबता असतो. येथील फाट्यावरून गावाकडे जात असताना आपणास समोरच गावाचा पाठीराखा असलेला पूर्व-पश्चिम पसरलेला हातगडचा डोंगर दिसतो.हातगड गावातून सरळ पुढे जाणाऱ्या रस्त्याने थोडे चालल्यावर गडाकड जाणारी वाट डावीकडे वळते. त्या वाटेवर आपणास विटांचे वैशिष्ट्यपूर्ण बांधकाम असलेली एक इतिहासकालीन इमारत पाहायला मिळते. ती इमारत पाहून आपण गडाच्या उजवीकडील टोकाकडून गड चढायला सुरुवात करायची. पुढे साधारण दहा मिनिटांचा सोपा चढ चढल्यावर पायवाट डाव्या हातास वळते, त्या वाटेने गडाला उजवीकडे ठेवत आपण समोर दिसणाऱ्या गडाच्या प्रवेशद्वाराच्या दिशेने पावले झपाझप उचलायची. पुढे पायवाटेच्या उजव्या हातास गडाच्या कातळात खोदलेले एक पाण्याचे टाके आपणास पाहावयास मिळते. ते टाके पाहून आपण समोरच दिसणाऱ्या गडाच्या पहिल्या प्रवेशद्वारात पोहोचायचे. हातगड गावातून येथे पोहोचण्यासाठी फक्त वीस मिनिटांचा वेळ लागतो.गडाच्या या छोटेखानी पहिल्या

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

दरवाज्याची कमान पडलेली असून त्याच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर पायात हत्ती धरलेल्या शरभाचे शिल्प आपणास पाहावयास मिळते. या दरवाजावरील एका दगडावर कोरलेला एक अस्पष्ट मराठी शिलालेखही असून त्याच्या खालचा दगड मात्र खाली निखळून पडला आहे. आपण हा दरवाजा पाहून पुढे गेल्यावर गडाचा दुसरा भग्न दरवाजा लागतो. दुर्लक्षामुळे या दरवाज्याची बरीच पडझड झाली असून त्या पडझडीतील दगडातून वाट काढत आपण गडाच्या तिसऱ्या कातळकोरीव दरवाज्यासमोर पोहोचायचे. हातगड किल्ल्याचे हे तिसरे प्रवेशद्वार संपूर्णपणे कातळात खोदून काढलेले असून त्याच्या उजव्या हातास आपणास एक कमी उंचीची अंधारलेली कोठी पाहावयास मिळते. येथेच डाव्या बाजूच्या कातळावर मारुतीची मूर्ती असून या कोरीव मूर्तीस गावकऱ्यांनी शेंदूर फासून लक्षवेधक बनविले आहे. आपण बजरंगबलींना वंदन करून कातळकोरीव पायऱ्यांनी गडमाथा गाठायचा.हातगडच्या माथ्यावर पोहोचताच डाव्या हातास आपणास गडाचा भक्कम तटबंदी पाहावयास मिळते. ती तटबंदी पाहात आपण गडाच्या उत्तरेकडील उतारावर पोहोचायचे. या ठिकाणी गडाच्या तटबंदीत गडास साजेशा चर्या बांधलेल्या असून आजही त्या चांगल्या अवस्थेत आहेत. या चर्यामधून खालच्या बाजूस पाहिल्यावर आपणास महाराष्ट्रातून गुजरात राज्यात जाणारा महामार्ग व पुढे गुजरातमधील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाणारे सापुतारा शहर एका दृष्टिक्षेपात पाहता येते. येथील गडाच्या तटावर अलीकडेच निर्माण करण्यात आलेले पीराचे धडगे व एक कोरडे पडलेले टाके असून बाकी या बाजूस फारसे दुर्गअवशेष नाहीत. ही गडाची बाजू पाहून आपण पुढे गडाच्या बालेकिल्ल्याकडे जाणाऱ्या पायऱ्यांकडे चालू लागायचे. आयताकृती आकाराचा हातगडचा माथा दक्षिणेकडून उत्तरेच्या उताराच्या दिशेने पसरलेला असून दक्षिण माथ्यावर सर्व महत्त्वाच्या इमारती व उत्तरेच्या उतारावर पाण्याचे तलाव व तटबंदी आपणास पाहावयास मिळते.गडाचा तट उजवीकडे ठेवत पायऱ्यांनी आपण हातगडच्या इमारतींनी गजबजलेल्या बालेकिल्ल्याच्या छोटेखानी परिसरात पोहोचायचे. या ठिकाणी उजवीकडील तटाला लागूनच उत्कृष्ट बांधणीची एक भग्न इमारत आपले लक्ष वेधून होते. अनेक सुरेख कोनाडे व त्यात देखणी गवाक्षे असणाऱ्या या इमारतीत इतिहासकाळात मोठी मातब्बर असामी राहात असणार याबद्दल आपल्या मनात कोणतीच शंका उरत नाही. या इमारतीतून खाली डोकावून पाहिल्यावर आपणास निवांत पहुडलेले हातगड गाव दिसते. या इमारतीच्या आजूबाजूला अनेक छोट्या-मोठ्या वास्तूंचे भक्कम चौथरे असून या ठिकाणी सध्या कोरडी पडलेली अनेक टाकीही आपणास दिसतात. या अवशेषांपुढेच तटाला लागून एक ध्वजस्तंभ उभा केलेला असून दरवर्षी हातगड ग्रामपंचायतीच्या वतीने या ठिकाणी ध्वजवंदन केले जाते. हा ध्वजस्तंभ पाहून आपण डाव्या हाताच्या धान्यकोठाराच्या इमारतीजवळ पोहोचायचे, लाल विटांनी मोठ्या कलात्मकरीतीने बांधलेल्या या वास्तूच्या आत एका पाठोपाठ एक कमानी असून आत उजेड येण्याकरिता पूर्व-पश्चिम भिंतीत झरोके ठेवलेले आहेत.

आपण ही धान्यकोठाराची इमारत व्यवस्थित पाहून तिच्या शेजारीच असणाऱ्या सुस्थितीतील कोठीत पोहोचायचे. या छोट्या कोठीचे प्रवेशद्वार उंचीने अगदीच छोटे असून सध्या ही कोठी काळोखाने झाकोळून गेली आहे. हे दुर्गअवशेष पाहात पुढे गेल्यावर खाली उतरण्यासाठी पायऱ्या असलेला एक छोटा तलाव आपणास दिसतो. इतिहासकाळात या तलावाच्या पाण्यानेच बालेकिल्ल्यात राहणाऱ्या मातब्बर मंडळींची तहान भागविली जात असे. हातगडचा बालेकिल्ला संपूर्णपणे जाडजूड तटबंदीने बंदिस्त केलेला असून तो व्यवस्थित पाहून आपण गडाच्या उत्तरेकडील उतारावर असणारे दुर्गअवशेष पाहायला पुढे निघायचे. या वाटेवर पुढे एक भव्य तलाव आपले लक्ष वेधून घेतो. या तलावात खाली उतरण्यासाठी दगडी पायऱ्यांचे दोन छोटे घाट बांधण्यात आले असून तलावाच्या मधोमध एक दगडी स्तंभही आपणास पाहावयास मिळतो. बाराही महिने पाण्याने भरलेला हा तलाव सध्या मात्र पाणवनस्पतींच्या गर्दीने झाकोळून गेलेला आहे. आपण हा तलाव पाहून पुढे जाताना गडाच्या बरोबर मधील उतारावर बांधलेला एक भव्य बुरूज माझ्याकडेही लक्ष द्या! असे सांगून आपणास खुणावतो. आतून पूर्णपणे पोकळ असलेल्या या बुरुजाच्या वरील भागात जाण्यासाठी आतूनच जिने असून त्यांच्या साहाय्याने वर गेल्यावर संपूर्ण गडमाथाच आपल्या दृष्टिक्षेपात येतो. येथून गडावर जिथे-तिथे उभारलेल्या इमारतींचे चौथरे, भव्य तलाव, पिण्याचे पाण्याचे कुंड, अखंड तटबंदी, त्यातील बुरूज हे सर्व अवशेष पाहिल्यानंतर इतिहासकाळात हातगड किती नांदता असला पाहिजे याचे धूसर चित्रच आपल्या नजरेसमोर उभे ठाकते.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal Dist. Sangli

इतर गडांवर शक्यतो तटबंदीत बुरूज बांधतात पण हातगडावर मात्र त्याच्यावरील दक्षिण-उत्तर उतारामुळे गडाच्या मधोमध हा बुरूज बांधण्यात आला असून या बुरुजावरून गडावर चौफेर लक्ष ठेवता येते.हा बुरूज पाहून गडाच्या उत्तर टोकाकडील तटबंदीच्या काठाकाठाने आपण गडप्रवेश केलेल्या प्रवेशद्वाराजवळ पोहोचायचे. संपूर्ण गडफेरी व्यवस्थित करण्यास २ तास लागतात. या गडफेरीत एक गोष्ट मात्र आपल्या मनास खटकते ती म्हणजे गडपायथ्याच्या हातगड गावाच्या ग्रामस्थांचे गडाकडे पूर्णपणे झालेले अक्षम्य दुर्लक्ष होय. खुद्द गाव गडाच्या नावाने ओळखला जात असताना, गावापासून गड फक्त २० मिनिटांच्या सोप्या चढाईवर असूनसुद्धा गावकरी या गडाकडे फारसे फिरकत नाहीत. गडावरील पाण्याच्या व चाऱ्याच्या आशेने फक्त गावकऱ्यांची जनावरे चरण्यासाठी गडावर येतात. बाकी या गडावर फारसे कोणी नसतेच. त्यामुळे एवढा सुरेख गड असूनही गडावर जिकडे-तिकडे काळ्या दगडांच्या राशी अस्ताव्यस्त पडलेल्या दिसतात. या दगडांच्या राशी जर श्रमदानाने उचलल्या गेल्या तर हातगडचे सौंदर्य एकदम उठून दिसेल. परतीसाठी आल्यावाटेने परत हातगड गावात उतरावे.हातगड सर्वांत प्रथम कोणी बांधला याचा दाखला इतिहासात फारसा कोठे मिळत नाही. पण या गडावरील कातळकोरीव टाकी व प्रवेशमार्ग पाहता हा गड शिवपूर्वकाळात निर्माण करण्यात आला असेल असे आपणास स्पष्टपणे म्हणता येते. पुढे औरंगजेबाने बागलाण राज्य जिंकून घेतल्यावर हातगड मोगल साम्राज्यात सामील झाला. शहाजहान व औरंगजेब यांनी भिकुजी यांना पाठविलेल्या पत्रात हातगडचा उल्लेख मिळतो. मोगलांकडून शिवरायांनी १६७०-७२ च्या दरम्यान हातगड जिंकून घेऊन स्वराज्यात सामील करून घेतला.हातगड पाहून पुढे फक्त ५ कि.मी. प्रवास करून आपण सापुतारा या गुजरातच्या हिल स्टेशनला भेट देऊ शकतो. सह्याद्री पर्वतराजीतील हे द्वितीय क्रमांकाचे उंच पठार असून या ठिकाणी बघण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत. डांग भागातील आदिवासींचे संग्रहालय, स्टेप गार्डन, सापुतारा लेक, सनसेट पॉइन्ट, आयुर्वेदिक उद्यान, नागेश्वर मंदिर, वोटिंग पॉइन्ट अशी अनेक प्रेक्षणीय ठिकाणे येथे आहेत. तेव्हा एवढ्या लांब आल्यासारखे हातगड भेटीत सापुतारा हे थंड हवेचे ठिकाण आपण सहजपणे पाहू शकतो.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist.Sangli
14 AUG 2025

## ब्रिटिशांच्या वैभवशाली सुवर्णकाळातील सम्राज्ञी

# महाराणी व्हिक्टोरिया

(१८१९-१९०१)



ब्रिटनच्या संविधानानुसार राजेपद हे आता प्रशासनाच्या शोभेचं पद असलं तरी काही व्यक्तींनी आपले गुण, स्वभाव व व्यक्तिमत्त्वाचा ठसा या पदावर उमटवून त्याची प्रतिष्ठा वाढवली. महाराणी व्हिक्टोरिया त्यांपैकी एक. ब्रिटिश साम्राज्याचा भला मोठा विस्तार, राजेपदाची नाजूक स्थिती आणि जगभरातील व्यापक परिवर्तनाचा काळ अशा अस्थिर स्थितीत व्हिक्टोरिया राणीने ब्रिटिश सत्तेची धुरा समर्थपणे सांभाळली. तिच्या कर्तृत्वाची छाप काळावर इतकी पडली की त्या काळाला 'व्हिक्टोरियन युग' असंच संबोधलं जातं. ब्रिटनच्या मूळ सामाजिक व राजकीय स्वरूपात मोठा बदल झाला तो या काळातच.

व्हिक्टोरिया राणीच्या आधिपत्याखाली जगात इंग्रजी साम्राज्य सर्वदूर पसरलं. त्यामुळेच एकेकाळी 'इंग्रजी साम्राज्यावर सूर्य कधीच मावळत नव्हता' असं म्हटलं जातं. तिच्या काळात ब्रिटनमधील घरगुती अर्थव्यवस्था पुढे औद्योगीकरणात परिवर्तित झाली. त्याचा पुढे जगावर दूरगामी परिणाम झाला. जगातील प्रगत राष्ट्र म्हणून इंग्लंड पुढे आलं. राणीच्या प्रदीर्घ कारकीर्दीत तिथली लोकशाही परिपक्व व व्यापक बनली. आपल्या राणीपदी आरूढ होण्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचं भाग्य व्हिक्टोरियाला लाभलं.व्हिक्टोरिया ही इ.स. १८३७ पर्यंत ब्रिटनच्या राजेपदावर आरूढ असणाऱ्या चौथ्या विल्यमची पुतणी. विल्यमचा धाकटा भाटू केंटचा ड्यूक याची ती मुलगी. तिचा जन्म १८१९ साली झाला. विल्यमचं १८३७ मध्ये निधन झालं आणि व्हिक्टोरिया वयाच्या अठराव्या वर्षी इंग्लंडची राणी बनली. तिच्या राज्यारोहणाबरोबरच हॅनोव्हर घराण्याचा इंग्लंडशी संबंध संपुष्टात आला व इंग्लंडच्या राजेपदाच्या वारसावादात युरोपने नसती लुडबुड करण्याचा धोका टळला. त्यामुळे नव्या राणीचं जनतेने उत्स्फूर्तपणे व मोठ्या थाटामाटात स्वागत केलं. 'व्हिक्टोरियन युगा'चा इथून प्रारंभ झाला.

राजसिंहासनाची जबाबदारी गंभीरपणे शिरी घेऊन राणी व्हिक्टोरियाने प्रशासनातील प्रत्येक बारीक-सारीक बाबींमध्ये लक्ष घातलं. चिकित्सक वृत्ती, निरीक्षणदृष्टी यांमुळेच व्हिक्टोरियाला आपल्या राजपदाची नाजूक स्थिती समजावून घेता आली. राणीने सूत्रं हाती घेतली तेव्हा इंग्लंडच्या इतिहासात राजांचा मान कायम होता. मात्र त्यांचं महत्त्व कमी करणारी रक्तहीन क्रांती झाली होती. त्यामुळे संसदेचं म्हणजेच मंत्रिमंडळ व पंतप्रधानाचं महत्त्व बरंच वाढून राजेपद केवळ शोभेचं राहिलं

P.V.P. MAHAVIDYALAYA ★ DEPARTMENT OF HISTORY ★ K.Mahankal, Dist. Sangli

होतं. अशा परिस्थितीत व्हिक्टोरियाला पंतप्रधान मेलबर्न यांची खूपच मदत लाभली. राजपदावरील व्यक्तींनी राजकारणापासून तटस्थ राहावं हे तिला या काळी शिकायला मिळालं. याच काळात इंग्लंडचं साम्राज्य कळसाला पोचलेलं होतं. राणीच्या राजमुकुटातील मानाचा दागिना म्हणजे भारत ही इंग्लंडची वसाहत होय. तेथील ईस्ट इंडिया कंपनीची पकड सैल करून इंग्लंडच्या संसदेने आपलं प्रभुत्व प्रस्थापित केलं होतं. उपयुक्ततावादी व उदारमतवादी सुधारणांचं पर्व सुरु करून भारतामध्ये अर्वाचीन कालखंडाची पायाभरणी सुरु झालेली होती.१८३२ नंतर इंग्लंडमधील संसदीय सुधारणा कायद्यांनी संसदेचं संघटन व स्वरूप बदलू लागलं होतं. खुल्या व्यापार धोरणाचे जोरदार वारे इंग्लंडमध्ये वाहत होते. त्यामुळे १८३३ नंतर ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारी मक्ता रद्द करण्यात येऊन इंग्लिश नागरिकांना व्यापार खुला करण्यात आला. आयात व्यापारावर निर्बंध घालणारे 'कॉर्न' कायदे रद्द करण्यात आले. हे परिवर्तन व्हिक्टोरिया राणीच्या आगमनानंतर अगदी भरात आलं, ते स्फूर्तिदायी ठरलं.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal,Dist.Sangli

22 AUG 2025

## राजकीय जगताला अहिंसेचा मंत्र देणारे

## महात्मा गांधी

(१८६९-१९४८)



भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लक्षावधी भारतीयांना शांततापूर्ण संघर्षाची प्रेरणा महात्मा गांधींच्या विचार व नेतृत्वामुळे मिळाली. स्वातंत्र्योत्तर काळातही गांधींचा सार्वजनिक जीवनावरील ठसा कायम राहिला. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांवर राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण यांचं संघटन करता येतं आणि असं संघटन अधिक न्याय्य असतं असं प्रतिपादन गांधींनी केलं. महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव भारतापुरता मर्यादित न राहता जागतिक पातळीवरही त्यांच्या विचारांची गांभीर्याने चर्चा होते.मोहनदास करमचंद गांधी (२ ऑक्टोबर १८६९ ते ३० जानेवारी १९४८) हे इ.स. १९१५ पासून 'महात्मा गांधी' म्हणूनच सर्वत्र ओळखले जाऊ लागले. अन्यायाचा प्रतिकार शांततापूर्ण मार्गाने करण्याची शक्ती त्यांनी सामान्य माणसाच्या ठायी निर्माण केल्यामुळे त्यांना महात्मा हे नामाभिधान मिळालं. गुजरातमधील मध्यमवर्गीय प्रतिष्ठित कुटुंबात जन्मलेल्या गांधींजींनी इंग्लंडमधून बॅरिस्टरची पदवी संपादन केली. वकिलीच्या कामानिमित्त ते दक्षिण आफ्रिकेत गेले (१८९३). तेथील वास्तव्यात वर्णभेदाविरुद्ध त्यांनी तिथल्या भारतीयांना संघटित केलं आणि सरकारी छळाला न जुमानता अहिंसक लढा उभारला. त्या लढ्यामुळे भारतातच नव्हे, तर जगभर त्यांची कीर्ती पसरली. १९१५ मध्ये भारतात परतल्यानंतर महात्मा गांधींनी पूर्ण वेळ सार्वजनिक कार्याला वाहून घेतलं. दक्षिण आफ्रिकेतील अनुभवाच्या आधारावर त्यांनी भारतातही शांततापूर्ण मार्गाने अन्यायाचा प्रतिकार करणारे लढे उभारले.

अनौपचारिकपणे १९१९ पासून काँग्रेसप्रणित स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व त्यांच्याकडे आलं. शेतकरी, शेतमजूर, स्त्रिया यांना चळवळीत सहभागी व्हायला प्रवृत्त करून गांधींनी स्वातंत्र्यलढ्याला जनसमूहाच्या चळवळीचं रूप मिळवून दिलं. १९२१ चं असहकारितेचं आंदोलन, १९३० चा मिठाचा सत्याग्रह आणि १९४२ चं 'चले जाव आंदोलन' निदर्शनं, असहकार आणि प्रत्यक्ष कायदेभंग अशा मार्गांनी गांधीचे हे गांधींच्या चळवळीचे मुख्य टप्पे सांगता येतील. मिरवणुका-मोर्चे, लढे विकसित झाले. या लढ्यांबरोबरच स्वदेशी, खादी ग्रामोद्योगाचा विस्तार, मूलभूत शिक्षण, अस्पृश्यता निवारण, इ. मार्गांनी जनशक्तीचा विधायक विनियोग करण्यावरही गांधींचा कटाक्ष होता.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

समाजजीवन लढ्यापुरती मर्यादित राहू नये म्हणून गांधी प्रयत्नशील होते. कारण अधिकाधिक निकोप व्हावं आणि चळवळ फक्त ब्रिटिशांविरुद्धच्या समाजाची रचना, व्यक्तिव्यक्तींमधील संबंध आणि आर्थिक व्यवहार या सर्वांचं पुनर्घटन त्यांना अभिप्रेत होतं. या कार्यासाठी कार्यकर्त्यांची मनोभूमिका तयार व्हावी आणि आदर्श सामुदायिक जीवनाचा वस्तुपाठ उभा राहावा म्हणून गांधीजींनी आश्रम-पद्धतीचा अंगीकार केल्याचं दिसतं. दक्षिण आफ्रिकेत असतानाच टॉलस्टॉय या रशियन विचारवंताच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी प्रथम फिनिक्स आश्रम व नंतर टॉलस्टॉय फार्म स्थापन केला होता. भारतात परतल्यानंतर अहमदाबादला त्यांनी आश्रम स्थापन केला. पुढे वर्धा जिल्ह्यात सेवाग्राम आश्रमाची स्थापना झाली. आपल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनात गांधींनी 'इंडियन ओपिनियन', 'यंग इंडिया', 'नवजीवन', 'हरिजन' या नियतकालिकांचं संपादन केलं व त्यामध्ये विपुल लेखनही केलं.भारतीय राजकारणात गांधींचा प्रवेश झाला तेव्हा एक मोठा गट सशस्त्र क्रांतीद्वारा स्वातंत्र्य मिळवू पाहणारा होता. गांधींनी पूर्ण अहिंसेचा पुरस्कार केल्याने या क्रांतिकारकांशी त्यांचे नेहमीच मतभेद राहिले. याउलट अगदी नेमस्त आणि फक्त कायदेशीर मार्गांनी कार्य करणाऱ्यांना गांधींचा संघर्षाचा मार्ग जहाल वाटला. बॅ. जीना यांच्या नेतृत्वाखालील मुस्लिम लीग व गांधी यांचेही संबंध तीव्र मतभेदाचे राहिले. गांधींच्या मते काँग्रेस हीच सर्व भारतीयांचं प्रतिनिधित्व करीत होती. उलट मुस्लिम लीगच्या मते काँग्रेस व गांधी मुस्लिमांच्या हिताविरुद्ध होते. धर्मांच्या आधारे लीगने केलेला द्विराष्ट्राचा पुरस्कार गांधींना अमान्य होता. दलितांना कशा प्रकारे प्रतिनिधित्व द्यावं या मुद्द्यावरून गांधी आणि आंबेडकर यांच्यातही मतभेद होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सवर्णांकडे सर्व सत्ता जाईल व दलितांवरील अन्यायाचा प्रश्न अनिर्णित राहील हा डॉ. आंबेडकरांचा आक्षेप होता. परंतु या मतभेदांपेक्षा व्यापक असे मतभेद व टीका यांचा गांधींना सामना करावा लागला. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत मुस्लिमांचा अनाठायी अनुनय केला जातो असा साबरकर व अन्य हिंदुत्ववाद्यांचा आक्षेप होता. याच भावनेतून नथुराम गोडसे या हिंदुत्ववाद्याने गांधींचा खून केला.

सत्य आणि अहिंसा ही सर्व मानवी जीवनाला प्रमाणभूत तत्त्वं आहेत असा गांधींचा आग्रह होता. सत्य म्हणजे विशुद्ध नैतिकता होय. तिच्या शोधातच व्यक्तीला आणि समूहांना काय योग्य आणि काय श्रेयस्कर याचा उलगडा होतो. सर्व मानवांच्या प्रती प्रेमभावना ही सत्याच्या शोधासाठी आवश्यक असते. सत्याच्या शोधात कोणत्याही प्रकारची हिंसा वर्ज्य असावी असं त्यांचं म्हणणं होतं. सामाजिक व राजकीय संदर्भात अन्यायाचा प्रतिकार करतानाही या दोन तत्त्वांचं पालन व्हावं असं गांधींनी सांगितलं. अशा प्रकारे शांततापूर्ण, अहिंसक मार्गांनी केलेल्या प्रतिकाराला त्यांनी सत्याग्रह हे नाव दिलं. प्रतिपक्षाला न फसवता, उघडपणे आणि प्रतिपक्षाचं हृदयपरिवर्तन करण्यासाठी सत्याग्रहाची कृती करायची असते. राज्यसंस्थेच्या संदर्भात ही कृती करताना असहकाराखेरीज अन्याय्य कायदे - न पाळण्याचा म्हणजेच शांततापूर्ण कायदेभंगाचा मार्गही

उपलब्ध असतो. - मात्र त्या कायदेभंगाबद्दल प्रस्थापित कायद्यानुसार होणारी शिक्षा - स्वीकारायची असते. सार्वजनिक व्यवहार जसजसे सत्य आणि अहिंसेवर - बेतले जातील तशी दंडसत्तेची गरज कमी होऊन समाजातील दंडसत्तेचा सर्वसंमतीने होणारा वापर कमी होत जाईल, असं गांधींचं म्हणणं होतं.आंतरिक शक्ती आणि आत्मशुद्धी यांवरही त्यांचा भर होता. त्यामुळे हृदयपरिवर्तनासाठी आणि प्रायश्चित्त म्हणून उपोषणाचा मार्गही त्यांनी अवलंबला. परंतु या मार्गात हृदयपरिवर्तनाऐवजी प्रतिपक्षाची नैतिक व व्यावहारिक कोंडी होते असाही प्रश्न उपस्थित झालाच.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

23 AUG 2025

# जगातील पहिल्या कामगारवर्गीय क्रांतीचे रशियन नेते

## लेनिन

(१८७०-१९२४)



रशियामध्ये २५ ऑक्टोबर १९१७ रोजी (जगाच्या कालमापनाप्रमाणे ७ नोव्हेंबर १९१७ रोजी) कामगारवर्गाच्या सत्तेच्या स्थापनेसाठी जी क्रांती झाली त्या क्रांतीचं वैचारिक, राजकीय व प्रत्यक्ष संघटनात्मक नेतृत्व लेनिन यांनी केलं आणि समाजवादाच्या उभारणीसाठी जगातील पहिल्या समाजवादी सत्तेचा झेंडा यशस्वीपणे उभा केला. जगाचा इतिहास आणि भूगोलदेखील बदलवून टाकणाऱ्या मानवी इतिहासातील महान राजकीय नेत्यांमध्ये लेनिन यांचा समावेश होतो. मार्क्सवादी सिद्धांताला क्रांतीचं डोकं आणि राजकीय पक्षाचं शरीर देण्याचं सर्वांत अवघड कार्य त्यांनी केलं.

लेनिन यांचं मूळ नाव ब्लादिमीर इलिच ऊल्यानोव्ह होतं. पुढे हद्दपारीच्या काळात त्यांनी लेनिन निकोलाय हे नाव धारण केलं व याच नावाने ते सर्वत्र परिचित झाले. लेनिन यांचा जन्म २२ एप्रिल १८७० रोजी होल्गा नदीच्या काठी सिबिरस्क या शहरामध्ये एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्या वेळी रशियामध्ये झार सम्राटांची राजेशाही सत्ता होती. झारशाहीमधील रशिया हा युरोप खंडातील सर्वाधिक विषमता, निरक्षरता, आर्थिक मागासलेपणा, धार्मिक कट्टरता तसंच राजकीय झोटींगशाही व दडपशाही असणारा देश होता. झारशाहीची राजवट ही जुलमी, अत्याचारी आणि कोणत्याही लोकशाही संस्थांच्या विकासास नकार देणारी राजवट म्हणून युरोपमध्ये ओळखली जात होती. या सत्तेला उलथवून टाकण्याचं काम लेनिन यांनी केलं.

लेनिन यांचं राजकीय जीवन 'युनियन ऑफ स्ट्रगल फॉर इमॅन्सिपेशन ऑफ दी वर्किंग क्लास' या गटाच्या स्थापनेतील सहभागापासून सुरु झालं. या गटाने काढलेल्या वृत्तपत्राच्या पहिल्याच अंकावर जप्ती आली आणि लेनिनसह गटातील अनेक सदस्यांना अटक करून दहा महिन्यांसाठी तुरुंगात डांबण्यात आलं. फेब्रुवारी १८९७ मध्ये तुरुंगातून सुटका झाल्यानंतर त्यांना सैबेरियामध्ये हद्दपार करण्यात आलं. १९०० मध्ये लेनिन यांची हद्दपारी संपली. परंतु त्यांना रशियामधील कोणत्याही महत्त्वाच्या औद्योगिक अथवा विद्यापीठाच्या शहरामध्ये राहण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे त्यांनी सरळ स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा इथे जाऊन पुढचं कार्य चालवण्याचा निर्णय घेतला. 'इस्क्रा' (ठिणगी) या रशियन सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या नव्याने निघणाऱ्या

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

वृत्तपत्राची जबाबदारी लेनिन यांच्यावर टाकण्यात आली. त्याच वेळेस क्रांतिकारक पक्षाची रचना, संघटनेची तत्वं, रशियामधील क्रांतीचं स्वरूप इ. राजकीय, संघटनात्मक विषयांवर आपले विचार स्पष्ट करणारं 'व्हॉट इज टू बी डन?' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केलं.पक्षाचं स्वरुप पोलादी शिस्तीचा व व्यावसायिक क्रांतिकारकांचा पक्ष असं असावं की नाही, 'कामगारवर्गीय हुकूमशाही' या संकल्पनेचा अर्थ कसा लावावा इ. अनेक राजकीय, वैचारिक मुद्द्यांवरून सोशल डेमोक्रॅटिक पक्षामध्ये तीव्र मतभेद निर्माण झाले. अखेर १९०३ मध्ये या पक्षाचे बोलशेव्हिक (बहुमतवाले) आणि मेनशेव्हिक (अल्पमतवाले) असे दोन गट निर्माण झाले. लेनिन हे बोलशेव्हिक गटाचे नेते होते. पुढे १९१२ मध्ये अधिकृतपणे हे पक्ष स्वतंत्र झाले.१९०५ मध्ये रशियामधील कामगारांचा झारशाहीविरोधात मोठा उठाव झाला. तो यशस्वी होऊ शकला नाही, परंतु या उठावातून झारला जनतेच्या उद्रेकाचं मोठं दर्शन घडलं. त्याच वेळेस कामगारांनी प्रदेश आणि शहरनिहाय आपली प्रतिनिधी मंडळं (सोव्हिएट्स) स्थापन केली. लेनिन यांच्या नेतृत्वाखाली बोलशेव्हिकांनी या सोव्हिएट्समधून आपल्या विचारांचा प्रभाव टाकण्यास सुरुवात केली.दरम्यान १९१४ साली सुरु झालेल्या पहिल्या जागतिक महायुद्धात रशियाने जर्मनीच्या विरुद्ध युद्धामध्ये पडण्याचा निर्णय घेतला. अपेक्षेप्रमाणे युद्धाच्या प्रक्रियेत रशियाची वाताहत झाली. केवळ नामधारी बनत गेलेल्या झारला जनरेट्यासमोर आपली सत्ता फेब्रुवारी १९१७ मध्ये सोडावी लागली. केरेन्सक्की यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारने झारकडून सत्ता हाती घेतली.याच वेळी हद्दपारीतून रशियात येण्याच्या परिस्थितीची सारी सूत्र जणू लेनिन यांच्या हातात आली. केरेन्स्की सरकारपासून लपतछपत आणि सतत जीवावरचा धोका सांभाळत अत्यंत गोंधळाच्या व अस्थिरतेच्या एप्रिल ते ऑक्टोबर १९१७ या काळात त्यांनी घट्टपणे बोलशेव्हिक पक्षाचं नेतृत्व केलं. 'केरेन्स्की सरकार' जनतेच्या क्रांतिकारी आकांक्षाचा घात करेल असं त्यांनी आपल्या पक्षातील नेत्यांना अत्यंत संघर्षमय वाद आणि चर्चांमधून पटवून दिलं. अखेर रशियन दिनदर्शिकेप्रमाणे २५ ऑक्टोबर १९१७ हा दिवस ठरला आणि त्या दिवशी मध्यरात्री सोव्हिएटच्या देशव्यापी परिषदेच्या पार्श्वभूमीवर, रक्ताचा एक थेंबदेखील न सांडता ऐतिहासिक विंटर राजवाडा बोलशेव्हीकांनी ताब्यात घेतला. आणि लेनिन यांच्या नेतृत्वाखाली नव्या बोलशेव्हिक सरकारची स्थापना करण्यात आली.

या सरकारने सत्तेवर येताच खासगी आणि चर्च यांच्या मालकीच्या जमिनी शेतकऱ्यांना वाटून दिल्या. बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्यात आलं. वारसा हक्क आणि उच्चवर्गीयांचे सर्व विशेष हक्क नष्ट करण्यात आले. जुनी न्यायालयं आणि पोलीस दलं संपुष्टात आणून त्या जागी क्रांतिकारक न्यायालयं स्थापन करण्यात आली. स्त्रियांना मताधिकार व पुरुषांप्रमाणेच समान हक्क मंजूर करण्यात आले.

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal,Dist.Sangli

26 AUG 2025

# सातारावासीयांचा अभिमान : किल्ले अजिंक्यतारा

किल्ले अजिंक्यतारा, शतकानुशतके सातारा शहराची प्रेमाने पाठराखण करणारा इतिहासप्रसिद्ध किल्ला. सातारा शहरामध्ये कोठेही उभे राहिले असता हा भव्य किल्ला आपल्या नजरेस पडतो. मराठ्यांच्या देदीप्यमान इतिहासातील या किल्ल्याचे योगदान जर मोजायचे झालेच, तर इतिहासकारांना आपल्या लेखण्याच्या लेखण्या झिजवाव्या लागतील. शिवरायांना गंभीर आजारपणात सावरणारा, छ राजाराम मायेनं महाराजांनी स्वराज्याची राजधानी म्हणून घोषित केलेला, औरंगजेबाशी तब्बल साडेचार महिने प्रखर झुंज देणारा, किल्लेदार प्रयागजी प्रभूसारख्या निधड्या छातीच्या वीराला नवसंजीवनी देणारा, मोगली आक्रमणातून स्वराज्य वाचविणाऱ्या रणरागिणी ताराराणींना साथ देणारा, छ. शाहूंच्या काळात अटकेपार पसरलेल्या, 'मराठी राज्याची राजधानी' म्हणून मिरविणारा, पहिल्या बाजीरावाच्या पराक्रमाचे छ.



शाहूंनी तोंड भरून केलेले कौतुक ऐकणारा आणि हो ! भल्या-भल्या राजधुरंधर व्यक्तींना आपल्या पोलादी कैदेत ठेवणारा, अशा एक ना अनेक रूपानी अजिंक्यतारा किल्ल्याने मराठ्यांच्या इतिहासात मोलाचे योगदान दिले आहे. समुद्रसपाटीपासून १००८ मीटर उंचीवर वसलेल्या या किल्ल्यास भेट देण्यासाठी आपणास प्रथम सातारा शहरात दाखल व्हावे लागते. अजिंक्यतारा किल्ल्याच्या पूर्व उतारावरच सातारा शहर वसलेले असून गडपायथ्याच्या शाहूनगरमधून किल्ल्यास पायी चालत जाण्यास पाऊण तास लागतो. ही पायपीट टाळायची असेल, तर मात्र सरळ रिक्षाने डांबरी सडकेने आपण गडाचे उत्तर प्रवेशद्वार गाठू शकतो. नागमोडी वळणा-वळणाच्या वाटेने वर-वर चढताना रस्त्याच्या उजव्या हातास जी हिरवीगर्द झाडी दिसते, ते आहे 'स्मृति उद्यान'.आपण हे उद्यान पाहून अजिंक्यतारा किल्ल्याच्या भव्य महादरवाज्यात दाखल व्हायचे अजिक्यतारा किल्ल्याचा भव्य असा हा महादरवाजा खरोखर पाहत राहावा असाच असून मुख्य म्हणजे त्याचे लाकडी दरवाजे आजही शाबूत आहेत काळया पाषाणात बांधलेल्या या दरवाज्याच्या कमानीवर गणपती, गरुडदेव यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. तर याच्या देवड्यांच्या जोत्यावर वाली-सुग्रीव युद्धाची कथा, ताक

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

घुसळणाऱ्या स्त्रिया, मोरशिल्प अशी वेगवेगळी उठावदार शिल्पे कोरलेली आहेत. आपण हे प्रवेशद्वार, त्याची लाकडी दारे, त्याचा भलामोठा कडी-कोयंडा, पहारेकऱ्यांच्या देवड्या, भव्य घुमट व्यवस्थित न्याहाळायचे व पायऱ्यांच्या वाटेने वर चालू लागायचे. पुढे लगेच उजव्या हातास गडाचे दुसरे प्रवेशद्वार लागते. या प्रवेशद्वारासमोरील तटाकडेने आपण महादरवाज्यावरील सज्जातही जाऊ शकतो. आपण गडाचा दुसरा दरवाजा पार करुन ऐन गडमाथ्यावर दाखल व्हायचे. सध्या अजिंक्यतारा किल्ल्यावर पोलीस दूरवहन मनोरा व त्यासंबंधित वेगवेगळ्या बैठ्या इमारती बांधण्यात आल्या असून या सर्व परिसराला दगडी कुंपण भिंत घालून लोखंडी दरवाजा लावण्यात आला आहे. गडाच्या सुरुवातीला महादेवाचे छोटेखानी मंदिर तर उजव्या हातास बलभीमाचे मंदिर आहे.आपण येथून सरळ कॉंक्रीटच्या पायवाटेने चालू लागायचे. पुढे मुख्य रस्ता सोडायचा व डाव्या बाजूच्या पायवाटेने आपण ताराराणींच्या राजवाड्याच्या भग्न इमारतीजवळ पोहोचायचे. याच वाड्यात महाराणी ताराबाई यांचे वास्तव्य १७३१ पासून त्यांच्या मृत्यूपर्यंत (१० डिसेंबर, १७६१) होते. येथून आपण सरळ पुढे न जाता गडाच्या उत्तर बाजूकडील दुर्गावशेष पाहण्यासाठी डाव्या हातास जाणाऱ्या पायवाटेने चालू लागायचे. पुढे वाटेत चुनेगच्ची बांधकाम असलेली दारूकोठाराची छोटेखानी इमारत लागते. ती पाहून पुढे गेल्यावर एक भव्य असा बांधीव तलाव लागतो. हा तलाव बारा महिने काठोकाठ भरलेला असतो. आपण गडाची ही उत्तर बाजू पाहून परत आल्या वाटेने ताराराणींच्या वाड्यापर्यंत यायचे व सरळ पायवाटेने पुढे चालू लागायचे. पुढे उजव्या हातास राजवाड्याचा भव्य चौथरा लागतो. काळ्या पाषाणातील हा सुबक बांधणीचा चौथरा पाहून त्यावरील पूर्वीचा राजवाडा किती भव्य असेल, याची आपणास आपसूक कल्पना येते. या चौथऱ्यापलीकडेच तेला-तुपाचे रांजण आहेत. पुढे गेल्यावर डाव्या हातास पेशवेकाळात बांधलेले छोटे महादेवाचे मंदिर 'लागते. या मंदिरापासून पुढे जाताना वाटेत आपणास एक गढूळ पाण्याचा तलाव दिसतो. हा तलाव पाहून गडाच्या काठाकाठाने जात आपण गडाच्या प्रशस्त तटावर चढायचे. या तटावरून संपूर्ण सातारा शहर एका दृष्टिक्षेपात दिसते.

येथून आपण दहा फूट रूंदीच्या प्रशस्त तटावरून गडाच्या एका कोपऱ्यात असलेला मंगळाई बुरूज गाठायचा. या बुरुजावर एक ध्वजस्तंभ असून येथील तटाजवळच गडाच्या अधिष्ठात्या आई मंगळाई देवीचे मंदिर आहे. मंदिर अगदी पाहायला मिळते. येथे समोरच अनेक वीरगळ ठेवलेले आहेत. गाभारा, मंडप व प्रशस्त असून मंदिराच्या गाभाऱ्यात देवीची पूर्वाभिमुख शस्त्रसज्ज मूती आपणास ओसरी अशा या तीन खणी मंदिराचा परिसर अगदी टापटीप व स्वच्छ ठेवलेला असल्यामुळे येथे आपण शांत वातावरणात थोडा वेळ विश्रांती घेण्यास हरकत नाहीमंगळाई देवीचे दर्शन घेऊन तटाकडेने पढे गेल्यावर अगदी गडाच्या तटास लागून असलेले एक प्रशस्त दारूकोठार लागते. महाराष्ट्रातील प्रमुख किल्ल्यांपैकी बहुतेक गडांवरील दारूकोठारांची छते नष्ट झाली असताना अजिंक्यताऱ्यावरील दारूकोठार मात्र सुस्थितीत पाहताना आपणास समाधान वाटते. हे दारूकोठार पाहून आपण गडाच्या दक्षिणेकडे चालू लागायचे. पुढे वाटेत आपणास परत दोन छोटे तलाव लागतात. त्यातील एका तलावाला लागून जमीन पातळीत गोलाकार आकाराची विहीर आपणास दिसते. अजिंक्यतारा किल्ल्यावरील जवळ-जवळ ६-७ तलावाचे पाणी गढूळ झाले असताना या विहिरीचे पाणी मात्र स्वच्छ पिण्यायोग्य राहिलेले आहे.येथून आपण गडाच्या दक्षिण बाजूस असणारा भव्य दरवाजा गाठायचा. सुस्थितीत असणाऱ्या या दरवाज्यास खाली उतरण्यासाठी पायऱ्या असून त्या उतरुन गेल्यावर परत एक दरवाजा लागतो. आपण हा दरवाजा पाहून परत वर यायचे व गडाच्या काठाकाठाने चालू लागायचे. पुढे उजव्या हातास तटापासून थोडं आतल्या बाजूस एक भव्य तलाव लागतो. याच्या काठावरच महादेवाचे एक सुस्थितीतील मंदिर असून ते पाहून आपण सरळ गडप्रवेश केलेल्या हनुमान मंदिराजवळ पोहोचायचं. या हनुमान मंदिराचा सातारावासीयांनी सुंदर जीर्णोद्धार केलेला असून हे मंदिर मुक्कामयोग्य आहे. येथे आपली संपूर्ण गडफेरी पूर्ण होते. संपूर्ण गड व्यवस्थितरीत्या भटकण्यास २ ते ३ तास लागतात. परतीसाठी आल्या वाटेने सातारा शहर गाठावे.अजिंक्यतारा किल्ला सप्तर्षी, साताऱ्याचा किल्ला या नावानेही इतिहासात परिचित होता. शिलाहार वंशीय राजा भोज (दुसरा) याने १२ व्या शतकात या किल्ल्याची निर्मिती केली. पुढे हा किल्ला बहामनी सत्तेकडे आणि मग विजापूरच्या आदिलशहाकडे गेला. इ. स. १५८० मध्ये पहिल्या आदिलशहाची पत्नी चाँदबिबी येथेच कैदेत होती. शिवाजी महाराजांनी अजिंक्यताऱ्याच्या भोवतालचे गड जिंकून घेतले, पण

P.V.P. MAHAVIDYALAYA
DEPARTMENT OF HISTORY
K.Mahankal, Dist. Sangli

